पुण्य नगरी

# ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या महसुलात वाढ

▮ मुंबई : ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.ने ३१ डिसेंबर २०२२ रोजी समाप्त झालेल्या तिसऱ्या तिमाहीसाठी त्यांच्या आर्थिक निकालांची घोषणा केली. यामध्ये आर्थिक वर्ष २०२२ ची तिसरी तिमाही वि. आर्थिक वर्ष २०२३ ची तिसरी तिमाहीमध्ये कंपनीने कार्यसंचालनांमधून ८८१ कोटी रुपये महसूल गोळा केला असून यात वार्षिक १६ टक्क्यांची वाढ झाली आहे. ईबीआयटीडीए आर्थिक वर्ष २०२२ च्या तिसऱ्या तिमाहीमधील ११४ कोटी रुपयांच्या तुलनेत १३८ कोटी रुपये झाला आहे. पीएटी (करोत्तर नफा) आर्थिक वर्ष २०२२ च्या तिसऱ्या तिमाहीमधील ७८ कोटी रुपयांच्या तुलनेत ९५ कोटी रुपये राहिला असून यात २२.९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०२२ ची नऊमाही वि. आर्थिक वर्ष २०२३ ची नऊमाही यामध्ये कंपनीने कार्यसंचालनांमधून २५३९ कोटी रुपये महसूल गोळा केला असून यात वार्षिक २०.५ टक्क्यांची वाढ झाली आहे. ईबीआयटीडीए आर्थिक वर्ष २०२२ च्या नऊमाहीमधील ३०० कोटी क्रुपयांच्या तुलनेत ३५२ कोटी रुपये झाला आहे. पीएटी आर्थिक वर्ष २०२२ च्या नऊमाहीमधील १९४ कोटी रुपयांच्या तुलनेत २२९ कोटी रुपये राहिला आणि १८ टक्क्यांनी वाढला आहे.



Powered by : eReleGo.com